देशदूत यूट्युब चॅनलसाठी क्यूआर कोड स्कॅन करा
YouTube
www.deshdoot.com

शिल्पकार विकासाचा...
# देशदूत




इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नाशिक | वर्ष ५७ । अंक ६ । बुधवार, दि. १० सप्टेंबर २०२५ । पाने - १२ | किंमत ₹ ५

**आतील पानात**

संपादकीय
शतकी महोत्सवावर चषकाची 'मोहोर'

आंतरराष्ट्रीय
भारत-चीन सहकार्याचे भवितव्य

पडसाद
चोरीचा मामला, हळूहळू बोंबला!

# गॅस टँकर उलटला; २४ तासांनंतरही वाहतूक ठप्प

**राहुड घाट मृत्युचा सापळा**

▸▸ **चांदवड । दीपक निकम**

चांदवड तालुक्यातून जाणाऱ्या मुंबई-आग्रा महामार्गावरील राहुड घाट पुन्हा एकदा अपघातांचा 'ब्लॅक स्पॉट' ठरला आहे. गेल्या दोन दिवसांत या ठिकाणी झालेल्या दोन भीषण अपघातांमुळे महामार्गावरील वाहतूक २४ तासांपेक्षा जास्त काळ पूर्णपणे ठप्प झाली. अपुऱ्या उपाययोजनांमुळे हा घाट प्रवाशांसाठी मृत्यूचा सापळा बनला आहे.

सोमवारी रात्री राहुड घाटात एक भीषण अपघात झाला. एका ट्रकला (यूपी ३३ सीबी १४९०) ओव्हरटेक करण्याच्या नादात चांदवडहून मालेगावच्या दिशेने जाणारा भारत गॅसचा बुलेट टँकर (एमएच ४६ बीबी १७८२) उलटला, यामुळे मोठ्या प्रमाणात गॅस गळती सुरू झाली. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आणि सुरक्षेच्या कारणास्तव महामार्गावरील वाहतूक थांबवून ती दुसऱ्या मार्गाने वळवण्यात आली. अपघातातील टँकरचालक कृष्णा चौबे (रा.आझमगड) याचा पान ८ वर »

### नेमका ब्लॅक स्पॉट का?

चांदवडहून मालेगावच्या दिशेने साधारण ८ कि.मी.वर असलेल्या राहुड घाटात वारंवार होणाऱ्या अपघातांची अनेक कारणे आहेत. रस्ता चौपदरी असूनही अपघात कमी होत नाहीत, कारण:

- **तीव्र उतार आणि अंध वळणे :** घाटातील तीव्र उतार आणि अचानक येणाऱ्या वळणांमुळे चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटते.
- **अतिवेग :** अनेक चालक वेगमर्यादा पाळत नाहीत, ज्यामुळे गाडी उलटण्याची किंवा घसरण्याची शक्यता वाढते.
- **अपुरे सुरक्षा उपाय :** अनेक ठिकाणी सुरक्षा कठडे, रिफ्लेक्टर आणि चेतावणी फलकांचा अभाव आहे.
- **अपुरा प्रकाश :** घाटात स्ट्रीट लाईटचे खांब असले तरी त्यावर लाईट नाहीत, ज्यामुळे रात्रीच्या वेळी किंवा धुक्यात दृश्यमानता कमी होते.
- **तांत्रिक बिघाड :** ब्रेक फेल होणे किंवा टायर फुटणे यांसारखे तांत्रिक बिघाड उतारावर अधिक धोकादायक ठरतात.



## थोडक्यात

### उपसा जलसिंचन योजनांना वीज बिलात सवलत

**मुंबई ।** शेतकऱ्यांसाठीच्या अतिउच्चदाब, उच्चदाब आणि लघुदाब उपसा जलसिंचन योजनेसाठीच्या वीजदर सवलत योजनेस आणखी दोन वर्षांसाठी म्हणजेच मार्च २०२७ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. यामुळे राज्यातील सुमारे १ हजार ७८९ उपसा सिंचन योजनांच्या खर्चात मोठी बचत होण्याबरोबरच त्याचा थेट फायदा उपसा सिंचन योजनांशी निगडीत शेतकऱ्यांना होणार आहे. ही योजना कृषी उत्पन्नात वाढ करण्यात सहायभूत ठरल्याने या योजनेला ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला.

## कांदा भाव



| | | |
|---|---|---|
| किमान | : | ६०० |
| कमाल | : | १७५२ |
| सरासरी | : | १३२० |

## शेअर बाजार

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | : ८११०१ (+३१४) |
| निफ्टी | : २४८६९(+९५) |

## सोने-चांदी

| सोने (प्रति १० ग्रॅम) | |
|---|---|
| २४ कॅरेट | १,०७,९०० |
| २२ कॅरेट | ९८,९२० |
| चांदी (प्रतिकिलो) | १,२७,५०० |

## तापमान

| | | |
|---|---|---|
| किमान | : | १७.६° |
| कमाल | : | २७.८° |

**मिश्किली** — धनंजय एकबोटे




काय? सत्तापालट झाली तरी सारे भ्रष्टाचारी पार्टी बदलून पुन्हा सत्तेवर येतील? तिथेही?

# ओलींचा राजीनामा

## धगधगते नेपाळ : माजी पंतप्रधानांच्या पत्नीला जिवंत जाळले

- **संसद भवनात घुसले निदर्शक**
- **सुरक्षा दलांची शस्त्रे लुटली**
- **अनेक मंत्र्यांचाही राजीनामा**

▸▸ **काठमांडू । वृत्तसंस्था**

सरकारचा भ्रष्टाचार आणि सोशल मीडियावरील बंदीमुळे नेपाळमध्ये दोन दिवसांपासून तरुणांचे हिंसक आंदोलन सुरू आहे. काठमांडुतून सुरू झालेले आंदोलन देशभर पसरले. यादरम्यान, नेपाळचे पंतप्रधान के.पी. शर्मा ओली यांनी अखेर आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. तत्पूर्वी देशाचे गृहमंत्री रमेश लेखक,



परराष्ट्रमंत्री डॉ. आरजू राणा देउबा, दळणवळणमंत्री पृथ्वी सुब्बा गुरुंग आणि ऊर्जामंत्री दीपक खड्का यांच्यासह अनेक मंत्र्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. पंतप्रधानांच्या राजीनाम्यानंतर लष्कराने देशाची सूत्रे हातात घेतली आहेत.

काल दुसऱ्या दिवशी आंदोलकांनी सर्व मंत्र्यांची घरेही पेटवून दिली. आजी-माजी पंतप्रधानांसह राष्ट्रपतींच्या घरात जाळपोळ करण्यात आली. तसेच सर्वोच्च न्यायालयही आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. या हिंसक आंदोलनात नेपाळचे माजी पंतप्रधान झलनाथ खनाल यांच्या पत्नी राजलक्ष्मी खनाल यांची हत्या झाली आहे.

> नेपाळमध्ये झालेली हिंसा हृदयद्रावक आहे. यात अनेक तरुणांनी आपला जीव गमावल्याचे जाणून खूप दुःख झाले. नेपाळची स्थिरता, शांती आणि समृद्धी आमच्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. मी नेपाळमधील माझ्या सर्व बंधू-भगिनींना नम्र आवाहन करतो की, त्यांनी शांतता व सुव्यवस्था राखण्याचे प्रयत्न करावेत.
>
> ■ **नरेंद्र मोदी,** पंतप्रधान

### नाशिकचे यात्रेकरू सुखरूप

**नाशिक ।** भारताचा शेजारी देश नेपाळ सध्या अस्थिरतेच्या गर्तेत अडकला आहे. नेपाळमध्ये मानससरोवर दर्शनासाठी गेलेल्या भाविकांचे नाशिकमधील नातेवाईक सध्या त्यामुळे चिंतेत आहेत. तसेच जे नेपाळी बांधव कामधंद्याच्या निमित्ताने नाशिकमध्ये राहतात त्यांच्यातही चिंतेचे वातावरण दिसत आहे. नेपाळ येथे दोन दिवसांपासून अराजकता माजली आहे. त्या संदर्भात नाशिकमधून नेपाळला गेलेल्या अठरा प्रवाशांशी ब्रिजमोहन टूर्स तर्फे ब्रिजमोहन चौधरी यांनी संपर्क साधला. सध्या तरी काठमांडूत आपले प्रवासी सुखरुप असल्याचे त्यांनी सांगितले.

# सी.पी. राधाकृष्णन उपराष्ट्रपती

▸▸ **नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

सी.पी. राधाकृष्णन हे देशाचे १५ वे उपराष्ट्रपती असतील. एनडीएचे उमेदवार राधाकृष्णन यांना ४५२ पहिल्या पसंतीची मते मिळाली. तर आघाडीचे उमेदवार सुदर्शन रेड्डी यांना ३०० पहिल्या पसंतीची मते मिळाली. राधाकृष्णन १५२ मतांच्या फरकाने विजयी झाले.

उपराष्ट्रपतीपदासाठी काल सकाळी १० वाजता मतदानाला सुरूवात झाली. एकूण मतदान ७६८ झाले होते, त्यात १५ मते अवैध ठरली आहेत. सी.पी. राधाकृष्णन यांना ४५२ मते मिळाली . तर बी. सुदर्शन रेड्डी यांना ३०० मते मिळाली आहेत. एनडीएची मते वाढल्याने इंडिया आघाडीला मोठा सुरुंग लागला आहे. लोकसभा आणि राज्यसभेचे मिळून ७८८ खासदार असतात. यापैकी ७ जागा रिक्त आहेत. तर १३ खासदारांनी मतदान केलेले नाही. एकूण ७८१ मतदान होणे अपेक्षित होते. परंतू, १३ मते पडलेली नाहीत. मतदान न करणाऱ्यामध्ये बीआरएसचे ४, बीजेडीचे ७, अकाली दलाचे १ आणि



अपक्ष १ अशा खासदारांचा समावेश आहे. एनडीएच्या ४२७ खासदारांनी मतदान केले आहे.

उपराष्ट्रपती म्हणून राधाकृष्णन राज्यसभेचे अध्यक्षपद सांभाळतील आणि राष्ट्रपतींच्या अनुपस्थितीत कार्यवाहक राष्ट्रपतीची जबाबदारी पार पाडतील. साध्या स्वभावाचे, शांत आणि अनुभवी राजकारणी म्हणून त्यांची कार्यशैली नावाजली गेली आहे. आरएसएस शाखेतून राजकीय कारकिर्दीला सुरुवात करून त्यांनी सातत्याने संघ-भाजपच्या कार्यात सक्रिय भूमिका निभावली आहे.

# सियाचीनमध्ये हिमस्खलनात तीन जवानांना वीरमरण

▸▸ **नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

लडाखमधील सियाचीन ग्लेशियरवर हिमस्खलनात भारतीय लष्कराचे तीन जवान शहीद झाले.काल येथे झालेल्या हिमस्खलनात वादळ एका लष्करी चौकीवर आदळले. त्यामुळे ही घटना घडली.

हिमस्खलनाची बातमी मिळताच, लेह आणि उधमपूरची मदत घेत लष्कराच्या बचाव पथकांनी तत्काळ बचावकार्य सुरू केले आहे. विशेष हिमस्खलन बचाव पथके (एआरटी) घटनास्थळी पोहोचली, जी बर्फात गाडलेल्या सैनिकांना वाचवण्याचा प्रयत्न केला. हे पथक लेह आणि उधमपूर येथून समन्वय साधत आहेत. जखमींना बाहेर काढण्यासाठी आणि त्यांना रुग्णालयात नेण्यासाठी चित्ता आणि एमआय-१७ सारख्या लष्कराच्या हेलिकॉप्टरचा वापर करण्यात आला. १९८४ मध्ये ऑपरेशन मेघदूत झाल्यापासून, हवामानामुळे १,००० हून अधिक सैनिक शहीद झाले आहेत.

# शासन निर्णय रद्द करा : भुजबळ

▸▸ **मुंबई । प्रतिनिधी**

**मराठा आरक्षण**

केवळ शपथपत्रांच्या आधारे जातीचा निर्णय घेण्याचा नियम भारतात कुठेही मान्य नाही. त्यामुळे आरक्षणासारख्यासंवैधानिक विषयामध्ये राज्य सरकारने शपथपत्रांचा आधार घेणे योग्य नसल्याचे मत व्यक्त करत महात्मा फुले समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष छगन भुजबळ यांनी मंगळवारी मराठा आरक्षणासंदर्भात राज्य सरकारने २ सप्टेंबर रोजी जारी केलेला शासन निर्णय रद्द करावा किंवा त्यातील संदिग्धता दूर करण्याची मागणी केली. भुजबळ यांनी आपल्या मागणीचे पत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले आहे.

मराठा समाजाला कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा प्रमाणपत्र देण्यासाठी हा शासन निर्णय काढण्यात आला आहे. मात्र या शासन निर्णयामध्ये अनेक शब्दांवर ओबीसी पान ८ वर »

### भुजबळांची मागणी फेटाळली

मराठा आरक्षणाच्या संदर्भात मंत्रिमंडळ उपसमितीने अतिशय विचारपूर्वक निर्णय केला आहे. त्यामुळे राज्य सरकारने जारी केलेला शासन निर्णय मागे घेण्याची किंवा रद्द करण्याची कोणतीही आवश्यकता स्पष्ट करत मंत्रिमंडळाच्या मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांनी मंगळवारी छगन भुजबळ यांनी केलेली मागणी फेटाळून लावली. भुजबळांचा याबाबत काही दुराग्रह असेल तर त्यावर चर्चा होऊ शकते. आम्ही सर्व सूचनांचे स्वागत करतो. आम्ही काही चौकट बांधून घेतलेली नाही, असे स्पष्ट केले.

# मालेगाव बॉम्बस्फोटातील पीडित उच्च न्यायालयात

▸▸ **मुंबई । प्रतिनिधी**


मालेगाव बॉम्बस्फोट खटल्यात भाजपच्या माजी खासदार प्रज्ञासिंह ठाकूर यांच्यासह कर्नल प्रसाद पुरोहित व अन्य पाच आरोपींना निर्दोष मुक्त करण्याच्या विशेष सत्र न्यायालयाच्या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात अपील दाखल करण्यात आले आहे.

स्फोटातील पीडितांनी दाखल केलेल्या अपिलावर न्यायमूर्ती अजय गडकरी यांच्या अध्यक्षतेखालील खंडपिठासमोर १५ सप्टेंबरला सुनावणी होण्याची शक्यता आहे.या अपिलात दोषपूर्ण तपास किंवा तपासातील काही त्रुटी आरोपींना निर्दोष सोडण्याचे कारण असू शकत नाही, असा दावा करण्यात आला असून आरोपींच्या सुटकेचा निर्णय रद्द करण्याची मागणी याचिकेत करण्यात आली आहे. या याचिकेमुळे प्रज्ञासिंहसह अन्य आरोपींच्या अडचणी वाढण्याची चिन्हे आहेत.

मालेगाव येथे २९ सप्टेंबर २००८ पान ८ वर »

# सीपीआरआय लॅबचे आज लोकार्पण

## केंद्रीय ऊर्जामंत्री खट्टर, मुख्यमंत्र्यांसह पाच मंत्री उपस्थित राहणार



▸▸ **नाशिक । प्रतिनिधी**

नाशिकसह पश्चिम भारतातील इलेक्ट्रिक हबला वरदान ठरणाऱ्या २१६ कोटी रुपये खर्चून शिलापूर, नाशिक येथे साकारलेल्या बहुप्रतिक्षित सेंट्रल पॉवर रिसर्च इन्स्टिट्यूट (सीपीआरआय) लॅबचे उद्घाटन बुधवार (दि. १०) रोजी दुपारी २.३० वाजता केंद्रीय ऊर्जामंत्री मनोहरलाल खट्टर यांच्या हस्ते होणार आहे.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ, जलसंपदामंत्री गिरीश महाजन, शिक्षणमंत्री दादा भुसे, अन्न व औषधे पान ८ वर »

### विद्यमान, माजी खासदार नाराज

सेंट्रल पॉवर रिसर्च इन्स्टिट्यूट लॅबच्या उद्घाटन सोहळा निमंत्रणावरून राजकीय वाद निर्माण झाला आहे. ज्या नेत्यांनी या प्रकल्पात मोठे योगदान दिले, त्यांनाच या समारंभातून डावलण्यात आल्याने स्थानिक राजकीय वर्तुळात तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. नाशिकचे विद्यमान खासदार राजाभाऊ वाजे यांनी या कार्यक्रमाबद्दल कोणतीही सूचना किंवा निमंत्रण मिळाले नसल्याचे सांगितले.माजी खासदार हेमंत गोडसे यांनीही तीव्र नाराजी व्यक्त केली. इमारतीच्या निधीपासून ते उभारणीपर्यंत सातत्याने पाठपुरावा करूनही आपल्याला निमंत्रण दिले गेले नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. विशेष लेख पान १० वर »

# औद्योगिक विकासाचे नवे पर्व सुरू

## नाशिकमध्ये गुंतवणुकीचा ओढा, हजारोंना रोजगार!

▸▸ **नाशिक । रवींद्र केडिया**

नाशिकच्या विकासाचा वेग आता राजकीय नेतृत्वाऐवजी उद्योजकांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे वाढताना दिसतोय. एकेकाळी जागा आणि पायाभूत सुविधांच्या कमतरतेमुळे गुंतवणुकदार इतर शहरांकडे वळत होते. मात्र, आता वाढवण बंदरामुळे नाशिक मध्यवर्ती ठिकाण बनले असून, उद्योजकांची पाऊले पुन्हा नाशिककडे वळू लागली आहेत.२०२५ हे वर्ष नाशिकच्या उद्योगविश्वासाठी सुखावह ठरले आहे. गेल्या काही दिवसांत हजारो कोटी रुपयांची मोठी गुंतवणूक जाहीर झाली आहे.

नाशिकमध्ये भरपूर पाणी, चांगले हवामान, उत्तम पायाभूत सुविधा आणि कुशल मनुष्यबळ मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. येथे ११ अभियांत्रिकी महाविद्यालये, सक्षम वैद्यकीय सेवा, पर्यटनस्थळे आणि नामांकित हॉटेल्सच्या शाखा असल्याने उद्योगांसाठी पूरक पान ८ वर »

**महिंद्रा अँड महिंद्रा :** इगतपुरी येथे ₹१०,००० कोटीं गुंतवणूक. इलेक्ट्रिक वाहन प्रकल्प. ५,००० रोजगार निर्मिती.

**ग्राफाईट इंडिया लिमिटेड :** मुंढेगाव येथे ₹४,७६१ कोटींचा सिंथेटिक ग्रॅफाईट ॲनोड प्रकल्प. १,१६६ रोजगार

**वर्च्योसो इलेक्ट्रॉनिक्स :** दिंडोरी येथे ₹८०० कोटींचा इलेक्ट्रॉनिक्स व मोटर कंपोनेंट्स प्रकल्प. ५०० रोजगार.

**एपीरॉक ए बी (जागतिक कंपनी) :** गोंदेदुमाला येथे ₹३५० कोटींची गुंतवणूक. खाण व बांधकाम उपकरण निर्मिती आणि संशोधन केंद्र. २०० रोजगार

> नाशिक जिल्ह्यातील या गुंतवणुकीमुळे नाशिकची औद्योगिक ओळख अधिक मजबूत होईल आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठी गती मिळेल.
>
> ■ **आशिष नहार,** अध्यक्ष, निमा